**<u>ठळक बातम्या</u>**

- अमेरिकेतून भारतीय नागरिकांना हद्दपार केल्याच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांचा संसदेच्या दोन्ही सभागृहात गदारोळ / लोकसभेचं कामकाज तीनवेळा स्थगित
- बेकायदेशीरपणे इतर देशात राहणाऱ्या नागरिकांना परत पाठवलं जाणं ही सामान्य कारवाई असल्याचं परराष्ट्रव्यवहार मंत्र्यांचं राज्यसभेत निवेदन
- राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रस्ताव चर्चेला प्रधानमंत्री आज राज्यसभेत उत्तर देणार
- राज्यात यापुढं औद्योगिक जमिनीचा वापर करण्यासाठी बिगरशेती परवानगी बंधनकारक नाही
- वरिष्ठ सनदी अधिकारी संजय सेठी यांची एसटी महामंडळाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती

  **आणि**
- ज्येष्ठ क्रिकेट समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांचं निधन

**<><><><><>**

**अमेरिकेतून** भारतीय नागरिकांना हद्दपार केल्याच्या मुद्यावरून विरोधी पक्षांच्या सदस्यांनी गदारोळ केल्यामुळे लोकसभेचं कामकाज दुपारी साडे तीन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभेचं कामकाज आज दिवसभरात तीनदा तहकूब झालं.

लोकसभेचं कामकाज दुपारी तिसऱ्यांदा सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी चर्चेची मागणी केली आणि घोषणाबाजी केली. त्यावेळी परराष्ट्र व्यवहार

मंत्री एस जयशंकर सभागृहात दुपारी साडे तीन वाजता स्पष्टीकरण देतील असं संसदीय कामकाज मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी सांगितलं. त्यानंतर कामकाज तहकूब झालं.

त्याआधी लोकसभेचं कामकाज सुरू झाल्यापासून गदारोळ सुरूच होता. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सदस्यांना  शांत करायचा प्रयत्न केला. हे परराष्ट्र धोरणासंबंधीचं प्रकरण असून सरकारने हे गांभीर्याने घेतल्याचं सभापतींनी सांगितलं. तसंच गदारोळ करणाऱ्या सदस्यांना बिर्ला यांनी समज दिली.

**<><><><><>**

बेकायदेशीररित्या राहणाऱ्या नागरिकांना हद्दपार करण्याची प्रक्रिया नवीन नसून ही सामान्य प्रक्रिया आहे, आपले नागरिक इतर देशात बेकायदेशीररित्या राहत असतील तर त्यांना परत आणणं हे आंतरराष्ट्रीय कायद्यामधे सामान्यपणे स्वीकारलेलं तत्व आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी सांगितलं. अमेरिकेने भारतीय नागरिकांना हद्दपार केल्याच्या मुद्द्यावरून विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर स्पष्टीकरण देताना ते राज्यसभेत बोलत होते. कायदेशीर स्थलांतराला प्रोत्साहन देणं आणि बेकायदेशीर स्थलांतराला विरोध करणं हे सार्वजनिक हिताचं आहे, असंही जयशंकर म्हणाले. काही भारतीय नागरिक अमेरिकेत बेकायदेशीररीत्या  राहत असल्याचं त्यांनी  यावेळी कबूल केलं.

**<><><><><>**

राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रस्ताव चर्चेला प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी आज राज्यसभेत उत्तर देतील. आज संध्याकाळी मोदी सभागृहाला संबोधित करतील, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी दिली. दोन

दिवसांपूर्वीच लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलचा आभारप्रस्ताव मंजूर झाला.

<><><><><>

परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमातून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारी म्हणजेच १० फेब्रुवारीला संवाद साधणार आहेत. परीक्षेच्या ताणाचं व्यवस्थापन विद्यार्थ्यांना करता यावं या दृष्टीनं प्रधानमंत्री या कार्यक्रमातून मार्गदर्शन करतात. नवी दिल्लीच्या भारत मंडपम् मधे होणाऱ्या या कार्यक्रमात विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातले मिळून ३६ विद्यार्थी प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात सहभागासाठी यंदा साडेतीन कोटी हून अधिक शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांची आवेदनं मिळाली असून ऑनलाईन स्पर्धेद्वारे त्यातून निवड केली जाईल असं केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं सांगितलं.

<><><><><>

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी काल शांततेत मतदान झालं. एकूण ६० पूर्णांक ४२ शतांश टक्के मतदान झालं असून सर्वाधिक ६४ टक्के मतदान ईशान्य दिल्लीत झाल्याचं निवडणूक आयोगानं सांगितलं. तर अग्नेय दिल्ली मतदारसंघात सर्वात कमी मतदान झालं. आम आदमी पार्टीचे समन्वयक अरविंद केजरीवाल, मुख्यमंत्री आतिशी, मनिष सिसोदिया, प्रवेश वर्मा, विजेंदर गुप्ता, अलका लांबा यांसारख्या दिग्गज नेत्यांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद झालं आहे.

निवडणूक सुरळीत पार पडावी यासाठी निवडणूक आयोगाने चोख बंदोबस्त ठेवला होता. मतदान केंद्रांवर मतदारांसाठी अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या

गेल्या होत्या. मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र स्ट्राँग रुममधे ठेवली आहेत. येत्या शनिवारी, ८ जानेवारी रोजी मतमोजणी होणार आहे.

दिल्लीत सत्ता परिवर्तन होईल, असा अंदाज अनेक माध्यमांच्या मतदानोत्तर चाचण्यात वर्तवण्यात आला आहे.

<><><><><>

राज्यात यापुढे औद्योगिक जमिनीचा वापर करण्यासाठी एन. ए. म्हणजेच बिगरशेती परवानगी बंधनकारक नसेल. यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत बदल केला जाईल. भारत सरकारच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाच्या ‘व्यापार सुलभता’ या महत्वाकांक्षी उपक्रमाचा भाग म्हणून हा निर्णय घेण्यात आल्याचं महसूल विभागानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. त्याचप्रमाणे वर्ग दोनच्या जमिनी वर्ग एक करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ दिली जाईल असं यात म्हटलं आहे.

जमीनधारकांना यापूर्वी जमिनीच्या औद्योगिक वापरासाठी मानीव अकृषिक वापराची परवानगी घेणं बंधनकारक होतं. मात्र त्यासाठी लागणार वेळ हा जमीन एन. ए. करण्यासाठी लागणाऱ्या वेळे एवढाच आहे, हे लक्षात घेता, शासनानं हा निर्णय घेतला.

जमिनीचा उद्योगासाठी वापर करायचा असेल, तर संबंधित परवानगीची तरतूद रद्द होईपर्यंतच्या कालावधीत देखील एन. ए. परवानगी आवश्यक नसेल. त्यासाठी संबंधित उद्योगाने सक्षम नियोजन प्राधिकरणाकडून विकासाची परवानगी घेतल्यावर किंवा नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम आराखडे मंजूर करून

घेतल्यावर ग्राम महसूल अधिकारी, म्हणजेच तलाठ्याच्या कार्यालयात त्याची नोंद करावी, असं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

लातूर जिल्ह्याचं ऐतिहासिक वैभव असलेल्या गंजगोलाई परिसराच्या सुशोभिकरणाला निधी उपलब्ध करून देण्यात येणार असून त्या कामाचा सविस्तर आराखडा सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. पवार यांच्या अध्यक्षतेखाली काल जिल्हा वार्षिक योजनेची राज्यस्तरीय बैठक झाली. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्य परिवहन महामंडळाच्या अध्यक्षपदी परिवहन सचिव संजय सेठी यांची नियुक्ती करण्यात आली आहे, असं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. यापूर्वी या पदावर लोकप्रतिनिधीची नियुक्ती होत होती, मात्र प्रथमच ही जबाबदारी एका सनदी अधिकाऱ्यावर सोपवण्यात आली आहे. सेठी यांच्याआधी शिवसेना नेते भरत गोगावले हे महामंडळाचे अध्यक्ष होते. मात्र, देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातल्या राज्य सरकारमध्ये गोगावले यांचा समावेश झाल्यानंतर त्यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे हे पद रिक्त होतं.

**<><><><><>**

नांदेड जिल्हाधिकारी पदावर नियुक्ती दिलेल्या राहुल कर्डिले यांनी आज आपला पदभार स्वीकारला. यापूर्वी ते सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक होते.

मावळते जिल्हाधिकारी अभिजित राऊत हे आता छत्रपती संभाजीनगर येथे वस्तू व सेवा कर विभागाचे सहायुक्त म्हणून आपला पदभार स्वीकारणार आहेत.

**<><><><><>**

ज्येष्ठ क्रिकेट समीक्षक आणि लेखक द्वारकानाथ संझगिरी यांचं आज मुंबईत निधन झालं ते ७४ वर्षांचे होते. गेले काही दिवस त्यांच्यावर लीलावती रुग्णालयात उपचार चालू होते. त्यांच्या पार्थिवावर उद्या शिवाजीपार्क स्मशानभूमीत अंतिमसंस्कार करण्यात येतील.

सिव्हिल इंजिनियर असलेले संझगिरी, मुंबई महानगरपालिकेतून मुख्य अभियंता म्हणून सेवा निवृत्त झाले होते. १९८० पासून त्यांनी लोकसत्ता, सामना, मिड डे अशा विविध वृत्तपत्रातून क्रीडाविषयक लेखन केलं. मराठीतलं पहिलं क्रीडा पाक्षिक एकच षट्कारचे कार्यकारी संपादक म्हणून त्यांनी काम पाहिलं. क्रिकेटविषयीची त्यांची अनेक पुस्तकंही प्रसिद्ध झाली आहेत.

**<><><><><>**

रत्नागिरीत उद्यापासून क्षेत्रीय वैदिक संमेलन होणार असून, त्यात चारही वेदांचं पठण केलं जाणार आहे. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाच्या रत्नागिरीतल्या भारतरत्न डॉ. पांडुरंग काणे संस्कृत अध्ययन उपकेंद्राने हे संमेलन आयोजित केलं आहे.

**<><><><><>**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक ८५ पदकांची कमाई केली आहे. त्यात १६ सुवर्ण, ३६ रौप्य आणि ३३ कास्यपदकांचा समावेश आहे.

**<><><><><>**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज नागपूरच्या विदर्भ क्रिकेट संघटनेच्या मैदानावर होत आहे. दुपारी दीड वाजता सुरू झालेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून इंग्लंडने प्रथम फलंदाजी स्वीकारली आहे. भारतीय संघाचं नेतृत्व रोहित शर्मा करत असून इंग्लंडच्या संघाची धुरा जोस बटलर याच्यावर आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा इंग्लंडच्या २१ षटकात ४ बाद ११७ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने अंतर्गत भंडारा इथले दोनशे ज्येष्ठ नागरिक काल बोधगयेला रवाना झाले. सहायक आयुक्त डॉ. सचिन मडावी यांनी गाडीला हिरवी झेंडी दाखवली.

**<><><><><>**

भरधाव वेगाने जाणाऱ्या विनक्रमांकाच्या स्कूल बसने दुचाकीला धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात दोन जण ठार झाल्याची घटना हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव- रिसोड रस्त्यावर काल घडली. या अपघातात जखमी झालेल्या दोघांना सेनगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आलं. मात्र दाखल होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.